# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:31.10.2025** **वार:शुक्रवार**

---

1. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम
2. केवडिया इथं एकता संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाचाही सहभाग
3. देशाचे 53 वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांची नियुक्ती
4. राज्यात ई-पीक पाहणीसाठी येत्या 30 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ आणि
5. महिलांच्या आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची विक्रमासह अंतिम फेरीत धडक

**एकता दौड**

देशाचे पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज दीडशेवी जयंती आहे. दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा सरदार पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीचं औचित्य साधून देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. गुजरातमध्ये केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकस्थळी प्रजासत्ताक दिन संचलनाच्या धर्तीवर एकता संचलनाचं आयोजन केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार आहे.

या संचलनात विविध राज्यांची पोलिस दलं, घोडदळ, उंटदळ, इत्यादी सहभागी असतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल पाटणा इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.....

**नौ सौ से ज्यादा कलाकार देशभर से आकर हमारे देश की सांस्कृतिक विरासत को देश और दुनिया के सामने रखेंगे और एक प्रकार से यह परेड साच अर्थ में भारत की एकता का परेड बनकर रहेगा। एक भारत श्रेष्ठ भारत के कांसेप्ट को जमीन पर उतारने का काम करेगा और सरदार साहब की डेढ़ सौवीं जयंती के बाद अब हर इकतीस अक्टूबर को छब्बीस जनवरी की तर्ज पर ही ये परेड नियमित रूप से मनाया जाएगा और हमेशा हमेशा के लिए देश के युवाओं को सरदार साहब के सिद्धांतों को और सरदार साहब के देश के लिए किए हुए कामों को जानकारी देने का ये माध्यम बनेगा।**

या संचलनात महाराष्ट्राचा 'एकतेचा धागा' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सहभागी होणार आहे. तसंच 7 आणि 8 नोव्हेंबरला सांस्कृतिक कार्यक्रमातही महाराष्ट्राच्या लोकपरंपरा दाखवणारं 15 ते 20 कलाकारांचं सादरीकरण असेल. येत्या 1 नोव्हेंबर पासून 15 नोव्हेंबर पर्यंत म्हणजेच भगवान बिरसा मुंडा यांची जयंती असलेल्या जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती शहा यांनी दिली.

दरम्यान भारत पर्वानिमित्त राज्यात होणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये युवकांनी भाग घ्यावा असं आवाहन राज्य शासनानं केलं आहे. यात पदयात्रा, निबंध, वादविवाद स्पर्धा, चर्चासत्र, पथनाट्य अशा विविध आविष्कारातून सरदार पटेल यांच्या जीवनकार्याची ओळख करुन देऊन या लोहपुरुषाला अभिवादन केलं जाणार आहे.

**बातमीपत्र बदल**

राष्ट्रीय एकता दिन आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंती निमित्त केवडिया इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या समारंभाचं प्रत्यक्ष वर्णन आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून सहक्षेपित करण्यात येणार आहे. या

प्रसारणामुळे पुणे केंद्रावरून प्रसारित होणारं राष्ट्रीय मराठी बातमीपत्र आज सकाळी साडेआठ ऐवजी 7 वाजून 45 मिनिटांनी प्रसारित करण्यात येईल.

**<u>सरन्यायाधीश</u>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत भारताचे 53वे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती केल्याबद्दल, केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जून राम मेघवाल यांनी समाज माध्यमावरून त्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>मांडवीय</u>**

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगारमंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते काल मुंबईत भारत समुद्री सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारतीय नौवहन क्षेत्रातल्या अग्रणी महिला कॅप्टन जे. सी. आनंद यांचा मांडवीय यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.

**<u>कर्जमाफी</u>**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबतचा निर्णय पुढील वर्षी 30 जूनपूर्वी घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रात्री मुंबईत केली. कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळासोबत घेतलेल्या बैठकीत त्यांनी सांगितलं की नैसर्गिक आपत्तीमुळं संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करणं सध्या आवश्यक आहे. रबीची पेरणी करता यावी, म्हणून 32,000 कोटींच्या पॅकेज वितरणास आत्ता प्राधान्य दिलं असल्याचं ते म्हणाले.

**<u>रस्ते-अहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातून छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि बीडकडे जाणाऱ्या सर्वच रस्त्यांची खड्ड्यांमुळे अक्षरशः चाळण झाली आहे. ऐकूया याबाबतचा वृत्तांत...

**अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या अनेक रस्त्यांवरच्या खड्ड्यांचा वाहनचालकांना मोठा त्रास होत आहे, खड्ड्यांमुळे या रस्त्यांवर अनेक अपघात होत आहेत. कोपरगावमध्ये एका युवकाचा तर अहिल्यानगर छत्रपती संभाजी नगर रस्त्यावर झालेल्या अपघातात वडील मुलाचा मृत्यू झाला. यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी कोपरगाव, राहुरी, शेवगाव इथं रस्त्यावर उतरून आंदोलनं केली. सणासुदीच्या काळातही या रस्त्यांची डागडुजी झाली नाही, त्यामुळे पुण्या मुंबईकडे जाणारे प्रवासी प्रचंड वैतागले आहेत, संबंधित यंत्रणांनी या प्रकरणी लक्ष घालून त्वरित रस्ते दुरुस्त करावेत अशी मागणी नागरिक करत आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज सातपुते अहिल्यानगर.**

**<u>ईपीक मुदतवाढ</u>**

राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील पूरसदृश परिस्थिती, अवकाळी पाऊस आणि दुबार पेरणी यामुळे 2025 च्या खरीप हंगामाच्या ई-पीक पाहणी नोंदणीत अनेक अडचणी आल्या; त्यांची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ई-पीक पाहणी नोंदणीला येत्या 30 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. महसूल विभागाने यासंदर्भातलं परिपत्रक जारी केलं आहे.

**<u>शेती नुकसान- रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या जोरदार पावसानं शेतकरी हतबल झाले आहेत. या लांबलेल्या पावसाने जिल्ह्यातलं शेतीचं नियोजन कोलमडलं आहे. ऐकुया याबाबत एक वृत्तांत...

**20 मेपासून पाऊस सुरू झाल्यामुळे अखेरच्या टप्प्यातल्या आंब्यासह कोकणी मेवा उत्पादक शेतकऱ्यांचं आणि त्यापासून साठवणुकीचे पदार्थ बनवणाऱ्या छोट्या उद्योजकांचं खूप नुकसान झालं. नंतर, अनुकूल परिस्थिती नसतानाच**

**भात या इथल्या मुख्य पिकाची पेरणी करावी लागली. मग काही काळ पावसाने विश्रांती घेतल्यामुळे लावणीचं वेळापत्रक बिघडलं. नंतर पुन्हा पाऊस आला तो अद्याप थांबलेला नाही. अनेक ठिकाणी भातपीक आडवं होऊन कोंब येण्याची स्थिती निर्माण झालीय. नाचणीचंही नुकसान झालंय. काहींना कापणी करताच आलेली नाही, तर काहींनी कापून ठेवलेलं भात भिजून गेलंय. कापलेलं भात सुरक्षित ठेवण्यासाठी किंवा झोडणीसाठी अनेकांकडे कोरडी जागाच नाही. एरव्ही एवढ्यात भातकापणी पूर्ण होऊन भाजीपाला, कुळीथ अशा पिकांच्या शेतीची तयारी सुरू होते. यंदा हे सगळंच नियोजन कोलमडलंय. छोट्या शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे दरडोई नुकसान मोठं आहे. त्या तुलनेत नुकसानभरपाई मात्र तुटपुंजी मिळते. नुकसानाची आकडेवारी पंचनाम्यांनंतर कळेल; आधीच अनेक समस्यांमुळे इथलं शेतीक्षेत्र घटत चाललंय. त्यात भर पडण्याची भीती या वर्षाने निर्माण केलीय. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघानं सात वेळा विश्वविजेत्या राहिलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. या स्पर्धेत अपराजित राहिलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा उपांत्य फेरीत भारतानं पाच गडी राखून पराभव केला. सामनावीर ठरलेली भारतीय फलंदाज जेमीमा रॉड्रिग्ज हीच्या 127 आणि कर्णधार हरमनप्रित कौरच्या 89 धावा हे भारतीय डावाचं वैशिष्ट्य ठरलं. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियन संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत 338 धावांचा डोंगर उभा केला होता. मर्यादित षटकांच्या इतिहासात आजपर्यंत सर्वात जास्त धावांचा यशस्वी पाठलाग करण्याची कामगिरी भारतानं या सामन्यात केली आहे. रविवारी दोन नोव्हेंबरला भारत आणि दक्षिण आफ्रिका संघांमध्ये अंतिम फेरीचा सामना होणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. किनारपट्टीवर सोसाट्याचे वाहतील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.